| | अहिल्यानगर जिल्हा परिषद<br>आरोग्य विभाग | |
|---|---|---|
| **जिल्हा आरोग्य अधिकारी**<br>**डॉ.बापुसाहेब नागरगोजे** | ०२४१/२३२३७५२ (का)<br>०२४१/२३२६९२३ (का)<br>०२४१/२३२९५४२ (एनएचएम)<br>०२४१/२३२७४२५ (फॅक्स) | जिल्हा आरोग्य आधिकारी कार्यालय<br>आरोग्य सेवा, जुने बसस्थानका समोर, जिल्हा परिषद,नविन इमारत अहिल्यानगर ०१<br>Email Id **ncdnagar@gmail.com**, **ncdahmednagar@gmail.com** |
| आरोग्य सेवा | जा.क्रं./ कर्करोग व तपासणी व जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत ../२०२५/७९९<br>/दि. 27/11/2025 | |

**प्रति,**
**वैदयकीय अधिकारी, (प्रा.आ.केंद्र सर्व)**
**समुदाय आरोग्य अधिकारी (आरोग्य उपकेंद्र सर्व)**
**जिल्हा अहिल्यानगर**

**विषय :- अहिल्यानगर जिल्हयात कर्करोग व तपासणी व जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत..**

संदर्भ :- १) डॉ.माने मेडिकल फाउंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर,साईधाम कॅन्सर हॉस्पीटल, राहुरी यांचे दि.२४/११/२०२५ रोजीचे पत्र
२) मा.जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडील आढावा बैठकीतील सूचना

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अहिल्यानगर जिल्हयामध्ये NP-NCD कार्यक्रमांतर्गत सामन्यतः आढळणाऱ्या मुखकर्करोग, स्तनकर्करोग, गर्भाशयमुखकर्करोगाची तपासणी, निदान व उपचार केले जातात व त्याची नोंदणी National NCD Portal वर केली जाते.

डॉ.माने मेडिकल फाउंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर,साईधाम कॅन्सर हॉस्पीटल, राहुरी यांच्या मार्फत कर्करोग तपासणी व्हॅन जिल्हाभरामध्ये तालुकास्तरीय नियोजीत कृती आराखडयानूसार फिरणार आहे. सदर व्हॅन मार्फत कर्करोग प्रतिबंध, लक्षणे, उपचार व जीवनशैली याबाबत जागरुकता कार्यक्रम राबविण्याचे नियोजीत आहे. हे उपक्रम गावांमध्ये शाळा - महाविदयालयांमध्ये, सरकारी कार्यालयांमध्ये आणि प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये आयोजित करण्याची योजना आखली जाणार आहे. या उपक्रमाचा उद्देश लवकर निदान, समुदायामध्ये आरोग्याविषयी जागरुकता वाढविणे आणि कर्करोगामुळे होणाऱ्या आजाराची तीव्रता कमी करणे हा आहे व निदान झालेल्या रुग्णांना उपचारासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनांतर्गत संलग्नीत रुग्णालयांमध्ये मोफत संदर्भ सेवा,उपचार व मार्गदर्शन, दिले जाणार आहे.

डॉ.माने मेडिकल फाउंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, साईधाम कॅन्सर हॉस्पीटल, राहुरी यांच्या समन्वयाने तालुकास्तरावर कृती आराखडा तयार करुन कर्करोग तपासणी, निदान व उपचार करण्यात यावे व कर्करोग रुग्णांची माहिति वैदयकीय अधिकारी/समुदाय आरोग्य अधिकारी यांनी National NCD Portal वर भरण्यात यावी.

27/11/2025

**(डॉ.बापुसाहेब नागरगोजे)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

१) मा.उपसंचालक नाशिक मंडळ नाशिक

२) मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर

३) मा.मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव –

तालुका आरोग्य अधिकारी, (सर्व) जिल्हा अहिल्यानगर

प्रत :-

२/– डॉ.माने मेडिकल फाउंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर,साईधाम कॅन्सर हॉस्पीटल, राहुरी यांनी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाशी समन्वयाने आपल्याकडील कॅन्सर व्हॅनाचा फिरती कृती आराखडा तयार करावा व राबविलेल्या अभियानाची व रुग्णांची माहिती तालुका आरोग्य अधिकारी यांना देण्यात यावी.

२७/११/२०२५

(डॉ.बापुसाहेब नागरगोजे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर